# मराठी विभाग

## सभा इतिवृत्त

दि. २।२।२०२२ रोजी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा मराठी विभागात स. ११.३० वा. मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. मराठी भाषा गौरव दिनाच्या आयोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली. सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे (मराठी विभाग प्रमुख)
डॉ. बाळासाहेब अनुसे
प्रा. साईनाथ पायारणे
प्रा. प्रतिक्षा खरडे

विषय क्र. १ – कवी कुसुमाग्रज (२७ फेब्रुवारी) यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मराठी विभागाच्या वतीने पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्याचे ठरले.

विषय क्र. २ – मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने डॉ. संजय मोरे, प्रा. प्रमोद पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्याचे ठरले.

विषय क्र. ३ – मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विशेषांकाचे प्रकाशन दरवर्षी करण्यात येते. मराठी विभागाच्या वतीने जी पत्रलेखन स्पर्धा घेण्यात येणार आहे. त्यातील उत्कृष्ट पत्रांचा समावेश असलेले 'शब्द प्रतिमा' विशेषांकाची निर्मिती करण्याचे ठरले. व त्याचे प्रकाशन मा. अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब यांच्या हस्ते करण्याचे निश्चित केले.

विषय क्र. ४ – प्रथम सत्राच्या अभ्यासक्रम पूर्तीसंदर्भात आढावा घेण्यात आला. अंतर्गत परीक्षा, सराव परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची अधिकाधिक परीक्षेची तयारी करण्यासंदर्भात सर्व विषय शिक्षकांनी प्रयत्न करण्याचे ठरले.

विषय क्र. ५ – पुढील महिन्यात जागतिक महिला दिनानिमित्त राजगुरुनगर येथील कवयित्री मा. मीनाक्षी पाटोळे यांचे व्याख्यान (online) आयोजित करण्याचे ठरले.

सर्व विषयांवर साधकबाधक चर्चा होऊन, सर्वांचे आभार मानून सभा समाप्त झाली.

डॉ. संजय शिंदे

Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar,Tal.Khed,Dist.Pune.

**मराठी विभाग प्रमुख**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.